आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
२ मार्च २०२५ रविवार

**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी तीन दिवसांच्या गुजरात दौऱ्यावर

- यापुढं निवडणूक आयोग पात्र मतदारांना एकमेव एपिक क्रमांक देणार

- महाराष्ट्र विधीमंडळाचं अर्थसंकल्पीय अधिवेशन उद्यापासून मुंबईत सुरु होणार

- रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात विदर्भाची विजेतेपदाच्या दिशेने दमदार वाटचाल

**आणि**

- आयसीसी चॅम्पियन्स चषक क्रिकेट स्पर्धेत आज भारत आणि न्यूझीलंड यांच्यात शेवटचा साखळी सामना रंगणार

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी तीन दिवसांच्या गुजरात दौऱ्यावर असून येत्या दोन दिवसांत ते विविध कार्यक्रमांमध्ये सहभागी होणार आहेत. वन्यप्राण्यांच्या संरक्षण आणि संवर्धनासाठी विकसित केलेल्या वनतारा या प्राणी बचाव आणि पुनर्वसन केंद्राला तसंच सासन गीर राष्ट्रीय उद्यानाला त्यांनी आज भेट दिली.

राष्ट्रीय वन्यजीव मंडळाचे पदसिद्ध अध्यक्ष या नात्याने ते  बैठक घेतील. त्यानंतर सोमनाथ मंदिरात पूजा आणि प्रार्थना केल्यानंतर मंदिर व्यवस्थापन करणाऱ्या श्री सोमनाथ ट्रस्टच्या बैठकीचं अध्यक्षपद भूषवतील. २७ कोटी

रुपये खर्चून बांधण्यात आलेल्या हाट बाजार आणि शॉपिंग सेंटरचं लोकार्पण यावेळी त्यांच्या हस्ते होईल.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आजपासून सुरु झालेल्या पवित्र रमजान महिन्यानिमित्त देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. रमजानचा पवित्र महिना श्रद्धा आणि भक्तीचं प्रतिक असून देशवासीयांना करुणा, दया आणि सेवा या मूल्यांची आठवण करून देतो, असं प्रधानमंत्र्यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. रमजानचा महिना समाजात शांती आणि सद्भावनेचा प्रसार करेल अशी कामना त्यांनी केली आहे.

मुस्लिमांचा पवित्र महिना रमजानला आजपासून प्रारंभ झाला असून, त्यानिमित्त प्रार्थना प्रवचन अशा धार्मिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात येत आहे.

<><><><><>

देशभरातल्या वेगवेगळ्या १२ प्रकरणातल्या  २९ अंमली पदार्थ तस्करांना न्यायालयानं दोषी ठरवलं आहे, अशी माहिती केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात दिली आहे. देशात वरपासून खालपर्यंत चालवण्यात आलेल्या शोध मोहीमेत या सर्वांना पकडण्यात आलं होतं. अंमली पदार्थांच्या सेवनामुळे देशातल्या युवकांचे आयुष्य खराब होत असल्यानं अंमली पदार्थांच्या तस्करांना कडक शासन करण्यासाठी मोदी सरकार वचनबद्ध असल्याचं शहा यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

निवडणूक आयोगातर्फे मतदारांना देण्यात येणारे एपिक नंबर एकाच वेळी दोन मतदारांना  दिले गेले असल्यास त्यामुळे बनावट मतदार तयार होण्याचा प्रश्न उद्भवत नाही असं केंद्रीय निवडणूक आयोगाने स्पष्ट केलं आहे. दोन वेगळ्या राज्यांमधल्या दोन मतदारांना एकच एपिक क्रमांक दिला गेल्याचं वृत्त काही माध्यमांमधून पसरलं असल्याच्या पार्श्वभूमीवर आयोगाने हा खुलासा केला आहे. एकच एपिक क्रमांक असला तरी या मतदारांचं नाव वेगळ्या राज्यात, वेगळ्या विधानसभा मतदारसंघात, आणि वेगवेगळ्या मतदानकेंद्रावर नोंदलेलं आहे. यापूर्वी मतदारनोंदणीची प्रक्रीया विकेंद्रीत असल्याने असे क्रमांक दिले गेले असावे. मात्र यापुढं सर्व पात्र मतदारांना एकमेव एपिकक्रमांक मिळावा यासाठी निवडणूक आयोग काम करत आहे, असं आयोगाच्या प्रसिद्धी पत्रकात म्हटलं आहे.

<><><><><>

वेव्ज समिट २०२५ अंतर्गत सुरू होणाऱ्या एक्स आर क्रिएटर हॅकेथॉनच्या संवादात्मक कार्यक्रमाचं आयोजन शुक्रवारी इंदूर इथे करण्यात आलं होतं. या कार्यक्रमात वेव्ज अंतर्गत येणाऱ्या विविध विषयांवरची चर्चासत्रं झाली, त्यात विविध तज्ज्ञांनी सहभाग घेतला होता. माध्यमांमध्ये बदल घडवणाऱ्या अनेक घटकांविषयी त्यांनी मार्गदर्शन केलं. माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं आयोजित केलेल्या वेव्ज या कार्यक्रमाचा हा प्रमुख उपक्रम असून तो १  ते ४  मे दरम्यान मुंबईत होणार आहे.

<><><><><>

गाझामध्ये रमजान सणाच्या काळात युद्धविराम वाढवण्याच्या प्रस्तावाला इस्त्रायलने सहमती दिली आहे. इस्त्रायलचे प्रधानमंत्री बेंजामिन नेतन्याहू यांच्या कार्यालयाने काल अधिकृत निवेदन जारी केलं असून त्यात अमेरिकेचे राजदूत स्टीव्ह विटकॉफ यांच्या युद्धविराम विस्तारासाठी सहमती देत असल्याचं म्हटलं आहे. हमासनेही या प्रस्तावाला सहमती दिली तर गाझामध्ये ओलिस ठेवलेल्या नागरिकांना पहिल्या दिवशी सोडलं जाईल. तसंच मरण पावलेल्यांचे मृतदेह पाठवले जातील. युद्धविरामाविषयी कायमस्वरुपी सहमती झाल्यानंतर उर्वरित ओलिसांची सुटका केली जाईल, असंही या निवेदनात म्हटलं आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्रात विधिमंडळाचं अर्थसंकल्पीय अधिवेशन उद्यापासून सुरु होत आहे. ऐकूया त्या पार्श्वभूमीवर आमच्या प्रतिनिधीनं घेतलेला आढावा….

**होल्ड- व्हॉईसकास्ट - कौस्तुभ पटाईत..**

*राज्य विधिमंडळाचं अर्थसंकल्पीय अधिवेशन उद्यापासून सुरू होत आहे. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या अभिभाषणानं अधिवेशनाला सुरुवात होईल. राज्याचा आगामी वर्षाचा अर्थसंकल्प १० मार्च रोजी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात मांडण्यात येईल. अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला आज सह्याद्री अतिथीगृह इथं चहापानाचा कार्यक्रम होणार आहे. तसंच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांची संयुक्त वार्ताहर परिषद आज संध्याकाळी होणार आहे. त्याआधी विरोधी पक्षांची वार्ताहर परिषदही होईल.*

*या अधिवेशनात विरोधी पक्ष सरकारला कायदा आणि सुव्यवस्थेच्या मुद्दयावरून घेरण्याची शक्यता आहे. परभणीतल्या कार्यकर्त्याचं कोठडीत मृत्यू प्रकरण, बीडमधली सरपंचाची हत्या आणि पुण्यातलं तरुणीचं बलात्कार प्रकरण यावरून विरोधक गृह खात्याला लक्ष्य करण्याची शक्यता आहे. विधानसभा निवडणुकीनंतर हे पहिलंच अधिवेशन असल्याने विरोधकांना लोकांच्या प्रश्नांवर एकजूट दाखवण्याची संधी आहे. सत्ताधारी याला कसं सामोरं जातात हे पाहणंही महत्त्वाचं आहे. तसंच महाविकास आघाडीला विरोधी पक्षनेतेपद मिळणार की नाही हेही या अधिवेशनात ठरणार आहे.*

आकाशवाणी बातम्यासाठी कौस्तुभ पटाईत, मुंबई.

**<><><><><>**

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात विदर्भाची विजेतेपदाच्या दिशेने दमदार वाटचाल सुरु आहे. नागपूर इथं सुरु असलेल्या या सामन्यात आज अखेरच्या दिवशी विदर्भानं केरळविरुद्ध दुसरा डाव कालच्या ४ बाद २४९ या धावसंख्येवरून पुढे सुरू केला. पहिल्या सत्रातच शतकवीर करूण नायर आणि त्यानंतर आणि हर्ष दुबे तंबूत परतले. त्यानंतर अक्षय वाडकर आणि अक्षय कर्णेवार छोटी पण धावसंख्येत मोलाची भर टाकणारी खेळी करून बाद झाले.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा दुसऱ्या डावात विदर्भाच्या ९ बाद ३४६ धावा झाल्या होत्या,आणि त्यांची एकूण आघाडी ३८३ धावांवर पोहचली होती.

आज सामन्याचा अखेरचा दिवस असल्यानं, पहिल्या डावातल्या आघाडीच्या जोरावर विदर्भाला पुन्हा एकदा विजेतेपदाची संधी आहे.

**<><><><><>**

आयसीसी चॅम्पियन्स चषक स्पर्धेत आज दुबई आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर भारताचा सामना न्यूझीलंडशी होणार आहे. हा सामना भारतीय प्रमाणवेळेनुसार अडीच वाजता सुरू होईल. अ गटातून भारत आणि न्यूझीलंड या दोन्ही संघांनी उपांत्य फेरीतलं स्थान निश्चित केलं आहे, मात्र या गटात सर्वोच्च स्थानी कोण राहणार, हे या सामन्यातून स्पष्ट होईल. या सामन्यातल्या विजेत्याचा सामना उपांत्य फेरीत मंगळवारी ऑस्ट्रेलियाशी होईल, तर पराभूत संघ बुधवारी दक्षिण आफ्रिकेविरुद्ध मैदानात उतरेल.
दरम्यान, दक्षिण आफ्रिकेनं काल इंग्लंडवर सात गडी राखून विजय मिळवत उपांत्य फेरीत प्रवेश केला आणि ब गटात पहिल्या स्थानी झेप घेतली.

**<><><><><>**

भारतीय टेनिसपटू ऋत्विक चौधरी बोलिपल्ली यानं आपला कोलंबियन साथीदार निकोलस बॅरिएंटोस याच्या सोबतीनं चिली खुल्या टेनिस स्पर्धेत पुरुष दुहेरीत विजेतेपद पटकावलं आहे. या जोडीनं प्रतिस्पर्धी अर्जेंटिनाच्या जोडीचा ६-३, ६-२ असा पराभव केला. ऋत्विक चौधरी आणि निकोलस यांचं दुहेरीतलं पहिलंच विजेतेपद आहे.

**<><><><><>**

बेंगळुरू खुल्या टेनिस स्पर्धेत अनिरुद्ध चंद्रशेखर आणि रे हो यांनी पुरुष दुहेरी प्रकाराचं विजेतेपद पटकावलं. या विजयासह त्यांनी सहावं एटीपी चॅलेंजर विजेतेपद पटकावलं.

**<><><><><>**

फुटबॉल इंडियन सुपर लीग स्पर्धेत, काल केरळमधल्या कोचीतल्या जवाहरलाल नेहरू स्टेडियमवर, जमशेदपूर आणि केरळ ब्लास्टर्स या संघात झालेला सामना १-१ असा बरोबरीत सुटला. यामुळे केरळ ब्लास्टर्स संघ स्पर्धेतून बाहेर पडला आहे.

या स्पर्धेतला आजचा सामना, संध्याकाळी साडे सात वाजता, ईस्ट बेंगॉल आणि बंगळुरू यांच्यात कोलकात्यातल्या सॉल्ट लेक स्टेडियमवर रंगणार आहे.

//<><><><><>//